# माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा
## फेब्रुवारी 2008

बैठक क्रमांक

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 1 | 5 | 1 | 5 | 4 | 0 | 1 | 9 | 9 |

प्रश्नपत्रिका कोड क्रमांक

| | | | |
|---|---|---|---|
| 0 | 1 | 1 | 1 |

## भाषा (मराठी)

एकूण गुण : 100

वेळ : 11.00 ते 12.00

*सर्वसामान्य सूचना :—*

*(1) खाडाखोड केलेली अगर गिरवलेली उत्तरे ग्राह्य धरली जाणार नाहीत.*

*(2) या प्रश्नपत्रिकेत **दोन** विभाग असून, विभाग 1 साठी 20 गुण व विभाग 2 साठी 80 गुण आहेत.*

### विभाग 1

**(गुण — 20)**

***सूचना :—(1) प्रश्नक्रमांक 1 व 2 उत्तरपत्रिकेच्या विभाग 1 मध्येच लिहावेत.***

***(2) या विभागातील प्रत्येक प्रश्नास 10 गुण आहेत.***

***(3) सुंदर हस्ताक्षर व टापटीप यासाठी दोन गुण राखून ठेवलेले आहेत.***

1. खालील विषयावर **दहा** ओळीत निबंध लिहा. त्यासाठी दिलेल्या मुद्द्यांचा उपयोग करा : 10

*'जाहिरातीचे युग'*

(**मुद्दे** : गरज, उपयोग, जाहिरातीचे फायदे-तोटे, तुम्हाला आवडलेली जाहिरात.)

2. दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे 10 ओळीत कल्पनाविस्तार करा : 10

*'सुख जवापाडे । दु:ख पर्वताएवढे ॥'*

(**मुद्दे** : उक्तीचा अर्थ, उदाहरणे, स्पष्टीकरण)

## विभाग 2

(गुण — 80)

*सूचना :—(1) या विभागातील उत्तरे उत्तरपत्रिकेच्या विभाग 2 मध्येच लिहा.*

*(2) या विभागातील प्रत्येक प्रश्नास 2 गुण आहेत.*

*(3) या विभागातील 3 ते 42 प्रश्नांना प्रत्येकी चार पर्यायी उत्तरे दिली आहेत. त्यापैकी योग्य उत्तराचा पर्यायक्रमांक उत्तरपत्रिकेत संबंधित प्रश्नक्रमांकासमोरील दिलेल्या मोकळ्या चौकटीत लिहा.*

*(4) शक्यतो खाडाखोड करू नये. एकदा नमूद केलेल्या उत्तरावर गिरवू नये. अशी दुरुस्त केलेली उत्तरे ग्राह्य धरली जात नाहीत.*

*(5) उत्तराची दुरुस्ती करताना चौकोनातील उत्तरक्रमांकावर [3] अशा प्रकारे तीन आडव्या रेषा माराव्या व बदललेल्या उत्तराचा पर्यायक्रमांक चौकोनापुढे उजव्या बाजूस लिहावा. जसे [3] 2.*

*(6) उत्तराची दुरुस्ती प्रत्येक प्रश्नासाठी फक्त एकदाच मान्य होईल.*

*(7) एका विषयासाठी दुरुस्त केलेल्या जास्तीत जास्त पाच उत्तरांची दुरुस्ती ग्राह्य धरण्यात येईल.*

**प्र. 3. ते 7. → खाली दिलेला उतारा काळजीपूर्वक वाचा. त्याखाली दिलेल्या प्रत्येक प्रश्नासाठी उत्तराचे चार पर्याय दिले आहेत. योग्य पर्यायाची निवड करून त्याचा क्रमांक उत्तरपत्रिकेत प्रश्नक्रमांकासमोरील चौकटीत लिहा.**

वेगवेगळ्या रंगाची वागणूक वेगवेगळी असते. प्रत्येक रंगाचा स्वभाव निराळा असतो. रंगांच्या या स्वभाववैशिष्ट्यांचा चित्रामध्ये निरनिराळ्या तऱ्हेने प्रत्यय येतो. पिवळा रंग सहज, सुंदर, स्वागतशील असून तो कुठल्याही रंगात सहज मिसळतो आणि त्या रंगाचं व्यक्तिमत्त्व आमूलाग्र बदलून टाकतो. निळा हा थंड प्रकृतीचा, पण भयंकर

हटवादी, ह्याचं सगळ्यांशी जमेल असं नाही. मात्र ज्याच्याशी जमेल त्याला तो आपलंसं करून स्वत:चं अस्तित्व कायम टिकवतो. तांबडा रंग मर्दानी बाण्याचा. तो जेथे असेल, तेथे त्याचंच राज्य चालतं. लाल रंग निष्ठुर, गर्विष्ठ, पण अतिशय सरळ, प्रामाणिक वाटतो. लाल रंगाला सहसा तडजोड मान्य नसते. हिरवा, तपकिरी, उदी, काळा यांचे स्वभाव थोडेसे विचित्र. तपकिरी, काळा हे अतिशय संशयी, तर हिरवा हेकेखोर, मत्सरी. गुलाबी, नारिंगी, करडा हे सौम्य रंग; ज्याच्याबरोबर असतील, तसंच वागणारे, जांभळा रंग उग्र, थोडासा एकलकोंडा, आपमतलबी, बेपर्वा. किरमिजी, अंजिरी हे त्याच कुळातले, पण त्यांचं व्यक्तिमत्व त्यामानानं साधं. चटणी शेवाळी हे रंग असेच मागं मागं असणारे, अबोल, घुमे. पांढरा हा सौम्य, प्रसन्न व्यक्तिमत्वाचा, अतिशय प्रामाणिक, पण आपली जरब ठेवून असलेला. पांढऱ्या रंगाचं सगळ्यांशी सारखंच नातं असतं. सारखीच जवळीक, पण वचकही तितकाच.

3. जरब ठेवणारा रंग कोणता ?

(1) लाल (2) पिवळा

(3) नारिंगी (4) पांढरा

4. अबोल रंग म्हणून कोणाचा उल्लेख केला आहे ?

(1) हिरवा व तपकिरी (2) चटणी व शेवाळी

(3) गुलाबी व नारिंगी (4) नारिंगी व हिरवा

5. स्वत:चे राज्य चालविणारा रंग कोणता ?

(1) पांढरा (2) तांबडा

(3) पिवळा (4) किरमिजी

6. निळ्या रंगाचे स्वभाववैशिष्ट्य कोणते ?

(1) एकलकोंडा (2) बेपर्वा

(3) आपमतलबी (4) हटवादी

7. सहज, सुंदर व स्वागतशील स्वभावाचा रंग कोणता ?

(1) तांबडा (2) पिवळा

(3) काळा (4) हिरवा

**प्र. 8. ते 12.→ खालील कविता वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे शोधा व त्यांचे पर्यायक्रमांक लिहा.**

स्वातंत्र्या रे तुझ्याचसाठी, दिले जयांनी प्राण
चरणांचाही आज तयांच्या, असे आम्हां अभिमान ॥ धृ ॥

बंध तोडुनी संसाराचे
कुणी घातले गळ्यात फास
कुणी भोगले काळेपाणी
तव मुक्तीचा एकच ध्यास
मायभूमीच्या त्या पुत्रांना, अमुचे लाख प्रणाम ॥ १ ॥

बलिदानांच्या ज्योतींमधुनी
स्वातंत्र्याची पहाट झाली
परवशतेच्या तिमिरामधुनी
मांगल्याची प्रभा हासली

सदैव देईल स्फूर्ती आम्हां, वीरांचे बलिदान ॥ २ ॥

इतिहासाची पाने गाती

त्या वीरांच्या गाथा

कृतार्थतेने आम्ही ठेवतो

त्या चरणांवर माथा

सदैव सांगे वायु आम्हां, त्यागाचा मंत्र महान ॥ ३ ॥

8. या कवितेत वारा कोणता महान मंत्र आम्हांस देतो ?

(1) स्वातंत्र्याचा (2) बलिदानाचा

(3) त्यागाचा (4) मुक्तीचा

9. मातृभूमीच्या सुपुत्रांना कोणता ध्यास होता ?

(1) मुक्तीचा

(2) परवशतेचा

(3) बलिदानाचा

(4) पर्याय (1), (2), (3) यामधील सर्वांचा

10. 'तुरुंगवास' या अर्थाचा कोणता शब्द वरील कवितेत आला आहे ?

(1) फास (2) काळेपाणी

(3) बलिदान (4) कारावास

11. वरील कवितेत वीरांच्या गाथा गाणारे कोण ?

(1) भाट (2) इतिहासाची पाने

(3) मायभूमीचे पुत्र (4) वायू

12. वरील कवितेतील वर्णन प्रामुख्याने ........................ आहे.

(1) भारताचे (2) स्वातंत्र्याचे

(3) परवशतेचे (4) स्वातंत्र्यवीरांचे

**प्र. 13. ते 17. → खालील संवाद वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांच्या योग्य उत्तराचे पर्यायक्रमांक चौकटीत लिहा.**

"खबरदार, पावसात गेलास तर—अगदी झोपून राहायचं गप्प," आईने बजावले.

"मला आलेपाकाची वडी हवीय," राजू.

'अरे, आज तर पंधरा जून !' पुटपुटत पांघरूण उडवून राजू बाहेर पळाला.

"राजू हा बघ गवती चहाचा गोड गोड काढा केलाय तुझ्यासाठी," आई बाहेर आली.

"राजू ऽ, राऽऽजू, गेला तरी कुठे बाई हा ! पुन्हा पावसात तर नाही गेला ?"

'टिंगटाँग' अशी घंटा वाजताच आईने झटकन दार उघडले.

"गधड्या, गेलास ना पुन्हा पावसात ! तरी शंभरदा बजावले होते.

देऊ का एक ठेवून आता !" आईने हात उगारला.

"हॅपी बर्थ डे ममी !"—गुलाबाचे फूल आईच्या हाती देत राजूने डोळे मिचकावले.

13. वरील संवादात किती जणांनी भाग घेतला आहे ?

(1) दोन (2) तीन

(3) चार (4) पाच

14. राजू बाहेर का पळाला ?

(1) पाऊस बघण्यासाठी (2) पावसात भिजण्यासाठी

(3) औषध आणण्यासाठी (4) गुलाबाचे फूल आणण्यासाठी

15. राजूच्या आईचा वाढदिवस किती तारखेला आहे ?

(1) १५/०८ (2) १५/०९

(3) १५/०६ (4) १५/०७

16. आईने राजूसाठी काय तयार केले होते ?

(1) आले घातलेला चहा (2) आलेपाकाची वडी

(3) गवती चहाचा काढा (4) गुलकंद

17. वरील संवादात 'बजावणे' हा शब्द कोणत्या अर्थाने आला आहे ?

(1) अनेकदा सांगणे (2) निक्षून सांगणे

(3) भरभर सांगणे (4) हळू सांगणे

**प्र. 18. ते 22. → खाली एका सुसंगत परिच्छेदाची वाक्ये दिली आहेत. परिच्छेदाची वाक्ये पूर्ण करण्यासाठी योग्य शब्दाचा पर्यायक्रमांक लिहा.**

18. तो ..................... महिना होता.

(1) ज्येष्ठ (2) आषाढ

(3) श्रावण (4) भाद्रपद

19. शाळेत ..................... तयारी चालू होती.

(1) गुरुपौर्णिमेची (2) नारळी पौर्णिमेची

(3) बुद्धपौर्णिमेची (4) कोजागिरी पौर्णिमेची

20. मुलामुलींनी एक मोठी ..................... तयार केली.

(1) व्यासमूर्ती (2) गणेशमूर्ती

(3) बुद्धमूर्ती (4) राखी

21. त्या सर्वांनी "करू या सारे ..................... रक्षण" या जयघोषात शाळेसमोरील जुन्या वृक्षाला राखी बांधली.

(1) मातेचे (2) भगिनींचे

(3) वृक्षांचे (4) वृद्धांचे

22. ..................... च्या दिवशी झाडांना राखी बांधून त्याचे रक्षण करण्याचा संकल्प सर्वांनी केला.

(1) रक्षाबंधना (2) भाऊबीजे

(3) मैत्रीदिना (4) विजयादशमी

23. 'मी धनुष्याला बाण लावला.' या वाक्यात सामान्यरूप असलेला शब्द कोणता ?

(1) मी (2) धनुष्याला

(3) बाण (4) लावला

24. 'सूर्य' या शब्दाला कोणता शब्द समानार्थी **नाही** ?

(1) सविता (2) दिनकर

(3) भास्कर (4) शशी

25. 'स्वतंत्र' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता ?

(1) परतंत्र (2) पारतंत्र्य

(3) लोकतंत्र (4) जनतंत्र

26. खाली दिलेल्या शब्दसमूहाबद्दल एक शब्द ओळखून त्याचा पर्यायक्रमांक लिहा.

हाताने केलेली खाणाखुणांची भाषा म्हणजे ......................

(1) नेत्रपल्लवी (2) पदपल्लवी

(3) मुखपल्लवी (4) करपल्लवी

27. खाली दिलेल्या वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा :

<u>मी</u> स्वत: त्याला पाहिले.

(1) पुरुषवाचक सर्वनाम (2) संबंधी सर्वनाम

(3) आत्मवाचक सर्वनाम (4) दर्शक सर्वनाम

28. 'मला आता काम करवते' या वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा व योग्य पर्यायक्रमांक लिहा.

(1) अकर्मक क्रियापद (2) शक्य क्रियापद

(3) सकर्मक क्रियापद (4) प्रयोजक क्रियापद

29. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचा प्रकार ओळखा :

तरी जोंधळा <u>बेदरकारपणे</u> कुंडीत डोलू लागला होता.

(1) रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यय

(2) कालवाचक क्रियाविशेषण अव्यय

(3) परिमाणवाचक क्रियाविशेषण अव्यय

(4) स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यय

30. खालीलपैकी कर्मणी प्रयोगाचे उदाहरण कोणते ?

(1) मुलगा पेढा खातो (2) मुलाने पेढा खाल्ला

(3) शिक्षकांनी मुलास शिकविले (4) मुलगा खातो

31. 'उज्ज्वल' या शब्दाचा संधीविग्रह खालीलपैकी कोणता ?

(1) उत् + ज्वल (2) उ + ज्ज्वल

(3) उज् + ज्वल (4) उत् + ज्ज्वल

32. 'शाहू महाराजांनी गाडी पुढे नेण्यास सांगितले' हे वाक्य पूर्ण भविष्यकाळी करा.

(1) शाहू महाराज गाडी पुढे नेण्यास सांगत असतील

(2) शाहू महाराज गाडी पुढे नेण्यास सांगत असत

(3) शाहू महाराजांनी गाडी पुढे नेण्यास सांगितलेली असेल

(4) शाहू महाराज गाडी पुढे नेण्यास सांगत होते

33. 'अर्धविराम' हे विरामचिन्ह केव्हा वापरतात ?

(1) दोन छोटी वाक्ये उभयान्वयी अव्ययांनी जोडली असता

(2) एकाच जातीचे अनेक शब्द लागोपाठ आल्यास

(3) वाक्याच्या शेवटी तपशील द्यायचा असल्यास

(4) दोन शब्द जोडताना

34. खालील शब्दातील अशुद्ध शब्द कोणता ?

(1) लुटुलुटु (2) दुडूदुडू

(3) मुळूमुळू (4) बारीकसारीक

35. खालील वाक्यात योग्य वाक्प्रचाराचा वापर करून वाक्य पूर्ण करा :

शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतरही साऱ्या मावळ्यांनी महाराजांचे, स्वराज्याचे स्वप्न साकार करण्यासाठी ........................ .

(1) जिवाची मुंबई केली (2) जीव लावला

(3) जिवाचे रान केले (4) जिवावर बेतले

36. खालील शब्दकोड्यात लपलेली म्हण ओळखा व त्या म्हणीतील बारावे अक्षर कोणते ते दर्शविणारा पर्यायक्रमांक लिहा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| गा | | णू | ली | र | म्ह |
| र | | ने | | | |
| दु | | का | | | |
| ने | ए | य | मा | | स |
| | | रू | | | स |
| | | न | | | मा |
| न्या | वा | रू | | | ये |

(1) स (2) र

(3) दु (4) न्या

37. योग्य अलंकारिक शब्द घालून खालील वाक्य पूर्ण करा.

अफझलखानाला शिवाजी महाराजास पकडणे म्हणजे ........................ वाटत होते.

(1) दुरापास्त (2) हातचामळ

(3) रामबाण (4) बाळकडू

38. 'घृष्णेश्वर' या शब्दातील व्यंजनांची संख्या किती ?

(1) चार (2) पाच

(3) सहा (4) सात

39. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचा कारकार्थ ओळखा.

बाबा कालच <u>मुंबईहून</u> आले.

(1) संप्रदान (2) अपादान

(3) करण (4) कर्म

40. ''टारफुला'' या कादंबरीचे लेखक पुढीलपैकी कोण ?

(1) य. गो. जोशी (2) रंगराव पाटील

(3) जयवंत दळवी (4) शंकर पाटील

41. खालीलपैकी क्रियापदाचा विध्यर्थ दर्शविणारे वाक्य कोणते ?

(1) सविता घरी जा. (2) सविता घरी जाईल

(3) सविता घरी गेली (4) सविताने घरी जावे

42. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाची विभक्ती ओळखा.

राम <u>शब्दार्थाची</u> वही शिवत बसला होता.

(1) प्रथमा (2) षष्ठी

(3) तृतीया (4) सप्तमी